Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I3IIVXIIIP0064

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Cyber Crime and Social Media
Issue–III(II), Volume–XIII

# पोक्सो कायदा—२०१२ बाल लैंगीक गुन्हांचे सरंक्षण

**डॉ. रमेश काशीराम शेन्डे**
मा. अं. मुंदाफळे समाजकार्य
महा. नरखेड जि. नागपूर. ४४१३०४.
मो. नं. ९४२३६०४७२३
mail- rkshende70@gmail-com

## प्रस्तावना—

पोक्सो कायदा म्हणजे लैंगिक गुन्हांपासून बालकांचे सरंक्षण कायदा—२०१२, हा कायदा बालकांचे लैंगिक अत्याचारापासून सरंक्षण करण्यासाठी आणि अशा घटनेतील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी भारत सरकारने २०१२ साली तयार केलेला कायदा आहे. भारतात जगातील सर्वात जास्त बालके राहतात. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील बालकांची संख्या ४७.०२ कोटी इतकी आहे, त्यांत मुलीची संख्या २२.५ कोटी इतकी आहे. भारतीय घटलेच्या कलम २१ नुसार भारतले भारतीय नागरिकांना बालकांच्या सरंक्षणाची खात्री दिलेली आहे. तसेच सयुक्त राष्टसंघाच्या बालहक्क जाहिरनाम्यावर सुध्दा भारताने ११ डिसेबर १९९२ रोजी स्वाक्षरी केलेली आहे. भारतातील बालकांवरिल लैंगिक अत्याचार विरोधी कायदे देशाच्या बालक संरक्षण धोरणाचा भाग म्हणून अधिनियमित करण्यात आले होते. राष्टीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीनुसार एकून बालकापैकी २४/ बालकांवर लैंगिक अत्याचार होतात, त्यांतील निम्मे अत्याचार बालकांच्या विश्वासातील प्रौढ व्यक्तींनी केलेले असतात. त्यामुळे एक स्वतंत्र कायदा करण्याची गरज होती.भारतीय संसदेने लैंगिक गुन्हांपासून बालकांचे संरक्षण विधेयक २०११ मध्ये पारित केले आणि २२ मे रोजी त्याचे कायद्यात रूपातर झाले. या कायद्यानुसार तयार करण्यात आलेले नियम सुध्दा नोव्हेबर २०१२ मध्ये अधिसूचित करण्यात आले आणि हा कायदा अंमलबजावणीसाठी तयार झाला.

## संशोधन पध्दती—

कोणत्याही विषयांचे संशोधन वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून या संशोधन पध्दतींचा अवलंब करून संशोधन कार्य केले जाते. म्हणून शोधनिबंधासाठी “पोक्सो कायदा—२०१२ बाल लैंगिक गुन्हांचे संरक्षण ” या विषयांची निवड केलेली आहे.

## उद्देश—

१. पोक्सो कायदा म्हणजे लैागिक गुन्हांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ चे अध्ययन करणे,
२. अशा घटनेतील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी भारत सरकारने २०१२ तयार केलेल्या कायद्याचे अध्ययन करणे,
३. भारतीय संसदेने लैागिक गुन्हापासून बालकांचे संरक्षण विधेयक २०११ मध्ये पारित केले आणि २२ मे रोजी त्यांचे कायद्यात रूपातरणाबाबत अध्ययन करणे,

## गृहितके—

१. भारतीय दंड संहिता १९६० नुसार संमतीने लैंगिक संबंध ठेवण्याचे वय १६ वर्षावरून १८ वर्ष केले आहे.
२. पोक्सो कायद्यातंर्गत सर्व गुन्हा खटला मुलांच्या पालकांच्या उपस्थितीत एका विशेष न्यायालयाने कॅमेरासमोर चालविला पाहिजे.
३. लैंगिक हेतुसाठी मुलांची तष्करी करणा—यासाठी कठोर शिक्षेची तरतूद या कायद्यात केली आहे.

## नमुना निवड पध्दती—

प्रस्तुत शोधनिबंधात गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सोईस्कर नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

## संशोधन आराखडा—

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I3IIVXIIIP0064

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Cyber Crime and Social Media
Issue–III(II), Volume–XIII

प्रस्तुत शोधनिबंधात अशत: वर्णनात्मक व अशत: निदानात्मक आराखडयाचा वापर करण्यात आलेला आहे.

तथ्य संकलन—

प्रस्तुत शोधनिबंधात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतामधील मुलाखत अनुसूची व निरिक्षण या तंत्राचा वापर करून दुय्यम स्त्रोतामध्ये पुस्तके, मासिके, योजना, वर्तमानपत्रे, इंटरनेट, शासकिय जीआर, ईत्यादी सांधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

साहित्य परिक्षण—

प्रस्तुत शोधनिबंधात पोक्सो कायदा २०१२ बाल लैंगिक संरक्षण कायदा या विषयांवर आतापर्यंत सेमिनार, वर्कशाप, परिसंवाद, गटचर्चा, कानफरस, झालेल्या नाही आणि हा लेख कुठेही प्रकाशित झालेला नाही म्हणून यामध्ये कोणत्याही पुस्तकातून कोणतीही माहिती घेण्यात आलेली नाही असे या साहित्य परिक्षणामध्ये स्पष्ट होत आहे.

लैंगिक गुन्हांपासून बालकांचे संरक्षण कायदा—

कायदेशीर प्रक्रियेच्या दरम्यान प्रत्येक टप्प्यावर मुलांच्या हितांचे संरक्षण करून लैंगिक हल्ले, लैंगिक छळ आणि पोनोग्राफी अशा प्रकारच्या गुन्हांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी एक मजबूत कायदेशीर चौकट करण्याकरिता लैंगिक गुन्हांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ तयार करण्यात आला. हा कायदा तयार करतांना बालक प्रथम या तत्वाचा अंगिकार करण्यात आला. यांमध्ये मुलांना त्रास होणर नाही अशा पध्दतींने अहवाल देणे, पुराव्याची नोंद करणे आणि खास नेमण्यात आलेल्या विशेष न्यायालयाच्यागाफिल जलद गतीने खटले चालविण्याचा समावेश करण्यात आला आहे. या नविन कायद्याद्रवारे विविध प्रकारच्या गुन्हांसाठी गुन्हेगारांना शिक्षा करता येईल, अशी तरतुद करण्यात आलेली आहे. यामध्ये बालकांचा विनयभंग सुध्दा गुन्हां ठरविण्याचा अधिकार आहे. हा कायदा लिंग—उदासिन आहे. तो मुलगा आणि मुलगी या दोघांना पण लागू होतो. पोर्नोग्राफी संदर्भात बालकांचा समावेश्या असलेली पोनोग्रफी पाहणे किंवा जवळ बाळगणे हा सुध्दा गुन्हां आहे. केवळ अत्याचार करणारा नव्हे तर अत्याचाराची माहिती असूनही तक्रार दाखल न करणारी व्यक्तींसुध्दा या कायद्याद्रारे गुन्हेगार मानण्यात आलेली आहे. २०१२ मध्ये बनविण्यात आलेल्या या कायद्यानुसार वेगवेगळया गुन्हासाठी वेगवेगळया शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

पोक्सो कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणा—

सन—२०१८ साली भारतातील कथुआ आणि उन्नाव येथे बालीकांवर बनात्कार झाल्याच्या घटन्नंनंतर गुन्हेगारांना कडक शिक्षा देण्याच्या दृष्टीने पोक्सो कायद्यात पुढील प्रमाणे बदल ककरण्यात आला आहे. १२ वर्षापर्यंतच्या मुलीवर बलात्कार करणारे दोषींना फाशीची शिक्षा दिली जाईल. १६ वर्षाखालील मुलीवर बलात्कार केल्यास कमीत कमी १० वर्षाची ते २० वर्षाची शिक्षेची तरतुद करण्यात आलेली आहे. सरकारने ठेवलेल्या या प्रस्तावाला २०१८ मध्ये केंद्रिय मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाली आहे.

पोक्सो कायद्यातील तरतूदी—

लैंगिक शोषणाची व्याख्या, यामध्ये लैंगिक छळ, पोर्नोग्राफी, लैंगिक आणि गैरभेदक हल्ला यांचा समावेश आहे. भारतीय दंड संहिता, १८६० नुसार संमतीने लैंगिक संबंध ठेवण्याचे वय १६ वर्षावरून १८ वर्ष केले आहे. यानुसार असा अर्थ होतो की, अ) जर कोणताही व्यक्ती (मुलासह) कोणत्याही मुलासोबत त्यांच्या संमतीने किंवा त्यांच्या संमती शिवाय लैंगिक कृत्य करत असेल ता त्याला पोक्सो कायद्यातर्गत शिक्षा द्यावी लागेल. ब) जर एखादा पतीने किंवा पत्नीने १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या जोडीदाराशी लैंगिक संबंध ठेवल्यास प्रवृत केले तर ते गुन्हांच्या श्रेणीत येते आणि त्यांच्यावर कारवाई होउ शकते. हा कायदा संपुर्ण भारतात लागू होतो आणि १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना लैंगिक गुन्हांपासून संरक्षण प्रदान करतो. ३. पोक्सो कायद्यांतर्गत सर्व गुन्हांचा खटला मुलांच्या पालकांच्या उपस्थितीत किंवा मुलाचा विश्वास असलेल्या व्यक्तींच्या उपस्थितीत एका विशेष न्यायालयाने कॅमेरासमोर चालवला पाहिजे. ४. जर आरोपी अल्पवयीन असेल तर त्यांच्यावर न्यायालय

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I3IIVXIIIP0064

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Cyber Crime and Social Media
Issue–III(II), Volume–XIII

कायदा २००० (मुलांची काळजी आणि संरक्षण) अंतर्गत खटला चालवला जाईल. ५. पिडीत बालक अंपग किंवा मानसिक किंवा शारिरीक आजारी असल्यास विशेष न्यायालयाने त्यांची साक्ष नोंदविण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी, अनुवादक, दुभाषी किंवा विशेष शिक्षकांची मदत द्यावी. ६. जर गुन्हेगारांने असा गुन्हां केला असेल जो बालगुन्हेगारी कायद्याच्या व्यतिरीक्त इतर कायद्यानुसार गुन्हां आहे, तर त्या अपराध्याला सर्वात कठोर कायद्यानुसार शिक्षा होईल. ७. खेटे आरोप करणे, खेटी माहिती देणे आणि एखाद्याची प्रतिमा ख्राब करणे यासाठी शिक्षेचीही तरतूद आहे. ८. लैंगिक हेतूसाठी मुलांची तस्करी करणा—यांसाठी कठोर शिक्षेची तरतूदही आहे. ९. सर्वोकृष्ठ आंतरराष्टीय बाल संरक्षण मानकानुसार, या कायद्यात अशी तरतूद आहे की जर एखाद्या व्यक्तीला एखाद्या मुलांचे लैंगिक शौषण झाल्याचखे माहिती असेल तर त्याने जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करावी. जर त्यांपे असे केले नाही तर त्याला शिक्षा होईल. १०. हा कायदा बालकांच्या पालकांची जबाबदारी पोलीसांवर सोपवली, यामध्ये मुलांचे संगोपन आणि संरक्षणसाठी तातडीने व्यवस्था करण्याची जबाबदारी पोलीसांवर देण्यात आली आहे. जसे की मुलांसाठी आपत्काली वैघकिय उपचार घेणे आणि मुलांना विश्रामगृहसत ठेवणे. ११. ही बाब २४ तासांच्या आत बाल कल्याण समितीच्या देखरेखीखाली आणण्याची जबाबदारी पोलीसांची आहे. जेणेकरून बालकल्याण समितीबालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक पावले उचलू शकेल. १२. बालकांच्या वैघकिय तपासणीसाठीही या कायद्यात तरतूद आहे, ज्यामुळे बालकांना कमी त्रास होईल, वैघकिय तपासणी मुलांच्या पालकांच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीत केली पाहिजेत ज्यावर मुलांचा विश्वास आहे. आणि त्यांची वैघकिय तपासणी महिला डॉक्टर कडून केली पाहिजे. १३. एखाद्या वैघकिय उपचार आणि पुनर्वसनाची व्यवस्था करण्यासाठी विशेष न्यायालय मुलाला भरपाईची व्यवस्था रक्कम निश्चित करू शकते. १४. कायद्यात अशी तरतूद आहे कीलहाण मुलांच्या लैंगिक शोषणाचे प्रकरण घडण्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत निकाली काढणे जाणे आवश्यक आहे.अ. लहाण मुलांच्या लैंगिक शोषणासाठी सरकारने पोक्सो कायद्यात २०१२ मध्ये तरतूद केली होती, ती खुप उशिरा करण्यात आली आहे. ब. २०१२—१६ या कालावधीत या कायद्यांतर्गत मुलावरिल लैंगिक गुन्हांची प्रकरणे ६११८ नोंदविण्यात आली आहेत. यामध्ये ८५/खटले अद्याप प्रलंबित आहेत, तर गुन्हेगारांला शिक्षणा होण्याचे प्रमाण केवळ २/ आहे जे कोणत्याही प्रकारे न्याय ठरत नाहीत. क. मुंबई हायकार्टाच्या नागपूर खंडपिठाने लै ांगिक शोषण प्रकरणात एक निर्णण दिला होता, मुलीचे कपडेन काढता गुप्तमार्गाना स्पर्ष करणे हे पोक्सो ॲक्टमधील कलम ७ अंतर्गत लैंगिक अत्याचार होत नाही कारण त्वचेचा त्वचेशी संपर्क नाही, असा निर्णय दिला होता. ड. परंतु ॲक्टने जनरल के.के. वेणूगोपाल या निर्णयाविरोधात सुप्रिम कोर्टात याचिका दाखल केली होती त्यावर सुप्रिम कोर्टाने हायकोर्टाच्या निर्णय बदलाबाबत महत्वाचा निर्णय दिला.

### सुप्रिम कोर्टाचा निकाल—

सुप्रिम कोर्टाचे काही महत्वाचे वाक्य— १. लैंगिक शौषण प्रकरणात मुंबई हायकोर्टाने तो निर्णय सुप्रिम कोर्टाने बदलला. २. त्वेचेचा त्वचेशी संपर्क नसेल तर लैंगिक अत्याचार होउ शकत नाही, हायकोर्टाचा हा निर्णय. ३. लै ांगिक शोषण प्रकरणात आरोपीला ठरवले दोषी, तीन वर्षाची शिक्षा सुनावली.

### सुप्रिम कोर्टाची केस विस्तारीत—

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंड पिठाने दिलेल्या निर्णयानुसार त्वचेचा त्वचेशी संपर्क आला नसेल तर तो लैंगिक अत्याचार होउ शकत नाही, हा निर्णय सुप्रिम कोर्टाने बदलला.२. सुप्रिम कोर्टाने गुरूवारी त्वचेचा त्वचेशी संपक ृआणि पोक्सो ॲक्ट संबंधी महत्वपुर्ण निर्णय दिला.

### गुन्हां—

१. अंतर्भेदी लैंगिक हल्ला
२. विकोपकारी अंतर्भेदी लै ांगिक हल्ला
३. लै ांगिक हल्ला

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)with International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I3IIVXIIIP0064
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Cyber Crime and Social Media
Issue–III(II), Volume–XIII

४. विकोपकारी लैगिक हल्ला

शिक्षा—

१. ७ वर्ष  आजीवन सश्रम कारावास
२. १० वर्षआजीवन सश्रम कारावास व दंड
३. ३ ते ५ वर्षकोणत्याही वर्णनाची शिक्षा व द्रव्य दंड
४. ५ ते ७ वर्ष कोणत्याही वर्णनाची शिक्षा व द्रव्य दंड

संशोधन निष्कर्ष—

कोर्टाने आपल्या आदेशात स्पष्ट केले की लैगिक श्शोषनाच्याष प्रकरणात त्वचेचा त्वचेशी संपर्क आला नाहीतरी पोक्सो कायदालागू होतो, हा निर्णय तीन संदस्यीय पिठाने दिला आहे. त्यामध्ये पुढील व्यक्तीचा समावेश होतो. १. यु.धु.ललित २. न्या. रविद्र भटट ३. न्या. बेला त्रिवेदी यांनी शरिराच्या गुप्तभागांना लैगिक हेतूने स्पार्ष केल्यास पोक्सो कायद्याचे प्रकरण मानले जाईल, असे स्पष्ट मत केले आहे. कपडयावरून मुलींना स्पर्श करणे लैगिक शोषण होउ शकत नाही असे म्हणतायेणार नाही. पोंक्सो कायद्यात कलम ७ नुसार स्पर्श आणि शारिरीक संपर्काचा अर्थे त्वचेचा त्वचेशी संपर्क इतपर्यत मर्यादित ठेवल्याने तो संकुचीत आणि मुर्खपणा ठरेल. अशा प्रकारची परिभाषा केल्याने मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण देण्यासाठी केलेल्या पोक्सो कायद्याचा हेतूच संपूष्टात येइल असे खंडपिठाने म्हटले आहे. याशिवाय या प्रकरणात आरोपीला दोषी ठरविले व पोक्सो कायद्यान्वये तीन वर्षाची शिक्षा सुनावली.

संदर्भ ग्रथसुची—

१. आगलावे प्रदिप  “सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे” साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. बोधनकर सुधीर  “सामाजिक संशोधन पध्दती” साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. पांगुळ नंदा  “व्यावसायिक समाजकार्य सिध्दांत आणि व्यवहार” पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर
४. शिंदे देवानंद  “व्यावसायिक समाजकार्य” डांयमंड प्रकाशन, पुणे.
५. साळवीकर संजय “व्यावसायिक समाजकार्य क्षेत्र आणि पध्दती” मंगेश प्रकाशन, नागपूर.
६. ताकसांडे प्राजक्ता “व्यावसायिक समाजकार्य” श्री प्रकाशन, नागपूर.
७. ताकसांडे प्राजक्ता “व्यावसायिक समाजकार्य विचारधारा” श्री प्रकाशन, नागपूर.
८. साळवीकर संजय “सामाजिक समस्या” मंगेश प्रकाशन, नागपूर.